21 MAR 2022

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भूकंप सदृश्य हालचालींवर राहणार लक्ष्य

## शिवाजी विद्यापीठात रेडॉन जिओ स्टेशनची स्थापना : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोल्हापूर आणि परिसरातील भुकंपसदृश्य हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी उपयुक्त असे रेडॉन जिओ-स्टेशनची स्थापना शिवाजी विद्यापीठात करण्यात आली आहे. हे विद्यापीठ लोणावळ्यानंतर अकृषी विद्यापीठात एकमेव विद्यापीठ ठरले आहे सर्व खर्च भाभा अनुसंशोधन केंद्राकडून केला जात आहे, अशी माहिती सैफ- सीएफसीप्रमुख डॉ. आर जी. सोनकवडे यांनी दिली.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात रेडॉन जिओ-स्टेशनच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. आर. जी. सोनकवडे, गजानन पळसे, डॉ. सदीप कंसल, जी. एस. पलसे, डॉ. के. वाय. राजपुरे आदी.**

या स्टेशनचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डि. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते केले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, डॉ. आर. जी. कुलकर्णी, डॉ. एम. व्ही. गुलावानी, प्रा. एस. एस. महाजन, भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. विजय फुलारी, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. नीलेश तलवार, भाभा अणूसंशोधन केंदाचे शास्त्रज्ञ डॉ. संदीप कंसल आदी उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठात सौर उर्जेवर चालणारे रेडॉन जिओ-स्टेशन विकसित केले असून उभारणी भौतिकशास्त्र विभागातर्फे सैफ-डिएसटी केंद्राच्या आवारामध्ये केली आहे. या स्टेशनची देशाच्या वेगवेगळ्या भागांत स्थापना करण्यात येत आहे. हे स्टेशन सौर उर्जा आणि डेटा कम्युनिकेशनद्वारे चालवले जाणारे स्वतंत्र युनिट आहे. त्यामध्ये बीएसएनएल सिमचा वापर केला आहे. १०० किलो वजनाचे हे स्टेशन २ मीटर जागेत स्थापित केले आहे. विद्यापीठातील हा जिओ-स्टेशन परिसरातील भूकंपीय हालचालींचे निरीक्षण करून भूकंपशास्त्रीय संशोधनासाठी डेटाबेस तयार करेल. हे सौरऊर्जेवर चालणारे स्टँडअलोन जिओ-स्टेशन रेडॉन डेटा थेट BARC मधील सेंट्रल स्टेशनवर प्रसारित करेल.

Times of India

# BARC sets up Radon Geo-Station at SUK

Times News Network

**Kolhapur:** The Mumbai-based Bhabha Atomic Research Centre (BARC) has set up a Radon Geo-Station — an earthquake early warning system — at the Shivaji University, Kolhapur.

The device, installed three-feet under the ground, has been made by the BARC and runs on solar energy.

R G Sonkawade, SUK's professor in physics and radiation expert, said, "Radon is a by-product of radioactive material. The device emits signal before the tectonic plates start to diverge or collide. The movement of tectonic plates is known as an earthquake."

He added, "It has already been found that Radon concentration in water springs increase before any such activity takes place. The device will detect the Radon and send a signal to the monitoring centre of the BARC. The device thus will help alert pre-seismic activities."

**The study of the upper crust of earth is carried out with the help of an advanced probe to fix the site. It is for the first time in Maharashtra that the device is fixed on the premises of any university. The Radon Geo-Station is the second joint venture between BARC and SUK**

The central government is making all the funds available to the BARC to set up such devices across the country under the Indian Network of Detection of Radon Anomaly project.

The study of the upper crust of earth is carried out with the help of an advanced probe to fix the site. It is for the first time in Maharashtra that the device is fixed on the premises of any university.


"The device weighs around 100 kg with the solar panels. It requires only two square metre space for installation. Learning seismic activities is our prime focus, but it will also aid scientific development of the students learning in the university," Sonkawade said.

Earlier, in 2019, the BARC has set-up device on the premises of the university to monitor the radiations in the atmosphere.

The Radon Geo-Station is the second joint venture between the BARC andShivaji University.

## महाराष्ट्र साहित्य और संस्कृति मंडल के अध्यक्ष ने कहा

# मराठी भाषा के विकास में जैन समाज का बड़ा योगदान





**कोल्हापुर** में डॉ. गोमटेश्वर पाटील की ओर से संपादित किए गए मध्ययुगीन मराठी जैन साहित्य के ग्रंथों का विमोचन करते डॉ. सदानंद मोरे, कुलपति डॉ. डी.टी. शिर्के और गणमान्य।

**कोल्हापुर.** प्राचीन समय से मराठी भाषा के विकास के हर मोड़ पर जैन साहित्य ने बड़ा योगदान दिया है। यह बात महाराष्ट्र राज्य साहित्य और संस्कृति मंडल के अध्यक्ष तथा वरिष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे ने यहां यह बात कही।

शिवाजी विश्वविद्यालय का संत तुकाराम अध्यासन व महाराष्ट्र राज्य साहित्य और संस्कृति मंडल, मुंबई के संयुक्त तत्वावधान में आयोजित कार्यक्रम में प्रमुख अतिथि के तौर पर वह बोल रहे थे। कार्यक्रम की अध्यक्षता कुलपति डॉ. डी. टी. शिर्के ने की। ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस और मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे भी उपस्थित थे।

यहां के दसरा चौक स्थित राजर्षि शाहू स्मारक भवन में हुए इस कार्यक्रम में महावीर महाविद्यालय के डॉ. गोमटेश्वर पाटील ने संपादित किए मध्ययुगीन मराठी जैन साहित्य का हस्तलिखित के 17 संपादित ग्रंथों के 24 खंडों का मान्यवरों के हाथों विमोचन किया गया। डॉ. सदानंद मोरे ने कहा कि मराठी भाषा जैनों की धर्मभाषा रही है। उसके साथ भाषावार प्रांतरचना से पहले कर्नाटक-महाराष्ट्र में सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक और भाषिक व्यवहार यह आम थे जिससे मराठी का पहला शिलालेख श्रवणबेळगोल स्थित गोमटेश्वर में मिलता है। इन हस्तलिखित ग्रंथों के संपादन से गोमटेश्वर पाटील ने सुभाषचंद्र अक्कोले के बाद बड़ा कार्य किया है। पाटील जैन मराठी साहित्य के चलते एक संपादित ग्रंथ करें जिसक विश्वविद्यालय की पढ़ाई में शामिल किय जाएगा। इस समय डॉ. राजन गवस, डॉ रणधीर शिंदे, कुलपति डॉ. डी. टी. शिर्व ने भी मार्गदर्शन किया। संत तुकाराम अध्यासन के समन्वयक डॉ. नंदकुमा मोरे ने स्वागत और प्रास्ताविक किया राजेश पाटील ने सूत्रसंचालन किया। डॉ शरद गायकवाड ने आभार माना। कार्यक्र को विवि के मानव्यविद्या विद्याशाखा वे अधिष्ठाता डॉ. आर. जी. कुलकर्णी इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीः पाटील, प्राचार्य श्रीधर हेरवाडे, अशोव बाबर, डॉ. राजेंद्र कुंभार, डॉ. आर.पी लोखंडे, डॉ. प्रभंजन माने के साथ शिक्षव और छात्र उपस्थित थे।

21 MAR 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्योती सुतारला अखिल भारतीय तलवारबाजीत कांस्यपदक



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

गुरुनानक विद्यापीठ अमृतसर (पंजाब) येथे सुरू असणाऱ्या अखिल भारतीय तलवारबाजी (फेन्सिंग) स्पर्धेत कोल्हापूरची खेळाडू ज्योती अरुण सुतार हिने फॉईल प्रकारात कांस्य पदकाची कमाई केली.

औरंगाबाद येथे झालेल्या राज्य संघ निवड चाचणीमधून ज्योतीची निवड शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून महाराष्ट्र संघात झाली होती. ज्योती आजरा महाविद्यालयाची खेळाडू असून तिला संस्थेचे अध्यक्ष अशोक चराटी, डॉ. अनिल देशपांडे, प्राचार्य डॉ. अशोक सादले, उपप्राचार्य राजीव टोपले, डॉ. धनंजय पाटील, अल्बर्ट फर्नांडिस, अशोक दुधारे, उदय डोंगरे विनय जाधव आदींचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी

# विद्यापीठात आजपासून मोडी स्क्रिप्ट प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्राच्या वतीने दि. २१ते २८ मार्च या कालावधीत सर्टिफिकेट कोर्स इन मोडी स्क्रिप्ट प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. विद्यार्थी संशोधक विद्यार्थी, इतिहास अभ्यासक, इतिहासप्रेमींनी अभ्यासक्रमास प्रवेश घ्यावा, असे आवाहन केंद्राच्या समन्वयक डॉ. नीलाबरी जगताप यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# मोडी अभ्यास केंद्रात प्रवेश सुरू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रातर्फे सर्टिफिकेट कोर्स इन मोडी स्क्रिप्ट प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या अभ्यास केंद्रात विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी, इतिहास अभ्यासक, इतिहासप्रेमी यांनी प्रवेश घ्यावा, असे आवाहन केंद्राच्या समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

जनसंपर्क कक्ष
21 MAR 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचे कयाकिंग स्पर्धेत यश

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ऑल इंडिया असोसिएशन ऑफ युनिव्हर्सिटी व पंजाब युनिव्हर्सिटी यांच्या विद्यमाने चंदीगड येथे दि. १४ ते १८ मार्चदरम्यान अखिल भारतीय महिला पुरुष कयाकिंग, कनोयीग स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंनी यश संपादन केले.

के-२ कयाकिंग २०० मीटरमध्ये करण घुनके, पवन कोळी यांनी रौप्यपदक मिळवले. ४ कयाकिंग २०० मीटर महिला स्पर्धेत शालिनी कृष्णात पिष्टे (डी. वाय. पाटील कॉलेज) कास्यपदक, राजनंदिनी तानाजी पाटील ( के आयटी कॉलेज), निकिता तानाजी पिष्टे (डी. आर. माने कॉलेज) श्रावणी विठ्ठल हाळीजवाले (विवेकानंद कॉलेज), के-४ कयाकिंग २०० मीटर पुरुष स्पर्धेमध्ये दर्शन पोवार, श्रेयांश पाटील, करण घुनके, कौस्तुभ पोकार्डे (सर्व डी. के. ए. सी. इचलकरंजी) कास्यपदक. या खेळाडूंना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. धनंजय पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्यनगरी

# भक्ती पोटे हिचे राष्ट्रीय क्रॉसकंट्री स्पर्धेत यश

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

येथील शिवराज महाविद्यालयाची विद्यार्थिनी भक्ती पोटे हिने



राष्ट्रीय क्रॉसकंट्री स्पर्धेत कास्यपदक पटकावले. कर्नाटकातील मुडबिद्री-मंगलोर येथे अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रॉसकंट्री स्पर्धा झाली. तिने शिवाजी विद्यापीठ संघातून चमकदार कामगिरी केली. तिला संस्थेचे अध्यक्ष प्रा. किसन कुराडे, सचिव अनिल कुराडे, प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांचे प्रोत्साहन, तर राहुल मगदूम, जयवंत पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले.


सकाळ

# देवचंद महाविद्यालयाला कुस्ती स्पर्धेत दोन सुवर्ण

नानीबाई चिखली, ता. २० : बन्सीलाल विद्यापीठ, भिवानी (हरियाणा) येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ महिला कुस्ती स्पर्धेत अर्जुननगर (ता. कागल) येथील देवचंद महाविद्यालयाच्या दोन खेळाडूंनी सुवर्णपदके पटकावली. यात ५० किलो फ्रीस्टाईल गटात नंदिनी साळुंखे हिने, तर ५३ किलो फ्रीस्टाईल गटात स्वाती शिंदे हिने सुवर्णपदक पटकावले. यानिमित्त पहिल्यांदाच शिवाजी विद्यापीठाला महिला कुस्तीत पदक जिंकून देण्याचा मान देवचंद महाविद्यालयाला मिळाला.

पन्नास किलो फ्रीस्टाईल गटात भारतातील विविध विद्यापीठातील ९६ महिला मल्ल सहभागी झाल्या होत्या. यावेळी अंतिम फेरीत नंदिनीची लवली विद्यापीठ पंजाबच्या आंतरराष्ट्रीय पदक विजेते मल्ल सिमरनबरोबर जोरदार लढत झाली. या लढतीत नंदिनीने १३-०२ अशा गुण फरकाने एकतर्फी विजय मिळवला.

त्रेपन्न किलो फ्रीस्टाईल गटात



नंदिनी साळुंखे व स्वाती शिंदे.

स्वाती शिंदेने संघर्षमय लढतीमधून सुवर्णपदक जिंकले.

खेळाडूंना जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आशिष शाह, उपाध्यक्ष डॉ. तृप्ती शाह, सुबोध शाह, प्रशिक्षक दादासो लवटे, विद्यापीठ कुस्ती संघाचे व्यवस्थापक डॉ. महेंद्र कदम पाटील, प्रशिक्षक डॉ. विक्रम नांगरे- पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ. प्रशांत शाह, उपप्राचार्य डॉ. एम. एम. बागवान, जिमखाना प्रमुख रवींद्र चव्हाण, निरंजन जाधव, जिमखाना कर्मचारी सुवर्णा पाटील, संतोष वागळे, वैभव सोनार यांचे सहकार्य लाभले.

तरुण भारत

# मोडीलिपी सर्टीफिकेट कोर्सला विद्यापीठात आजपासून प्रवेश

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रातर्फे २१ मार्च ते २८ मार्च या कालावधीत सर्टिफिकेट कोर्स इन मोडी स्क्रिप्ट प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. इच्छुकांनी प्रवेश घ्यावा, असे आवाहन केंद्राच्या समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांनी केले आहे. इतिहास व तत्सम सामाजिक शास्त्रांमध्ये संशोधन करू इच्छिणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार आहे. त्यामुळे विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी, इतिहास अभ्यासक, इतिहासप्रेमी प्रवेश घेऊ शकतात.